# महात्मा ज्योतिबा फुले जल – भूमी संधारण अभियान

राज्यातील पर्जन्यधारीत कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचन उपलब्धता वाढविणे, अत्यंत मौल्यवान असे पाणी व माती यांचे संवर्धन करणे, पडीक जमिनीचा विकास करणे, रोजगार उपलब्धतेत वाढ करणे आणि पर्यायाने कृषि उत्पादनात वाढ करून मौल्यवान भूसंपत्तीमध्ये स्थायी स्वरूपाची सुधारण करणे या करिता महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान राज्यात दिनांक १ मे, २००२ पासून सुरू करण्यात आले. हे अभियान प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, शासन तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागाद्वारे यशस्वीरित्या राबविण्यात आले. लोक-सहभागातून राबविलेल्या या अभियानाचे यश पाहता हे अभियान सन २००२-२००३ पासून सातत्याने राबविण्यात येत आहे. हे अभियान सन २०१४-१५ मध्येही पुढे सुरू ठेवण्यास शासन निर्णय, दिनांक ७/३/ २०१४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

**अभियानाची प्रमुख उद्दिष्टे :**

१. राज्यातील पर्जन्यधारीत कोरडवाहू शेतीची पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचन उपलब्धता वाढविणे.

२. राज्यातील पडीक जमिनीचा विकास, रोजगार व उपलब्धता वाढविणे.

३. जलसाक्षरता चळवळ राबविणे, पाण्याचा योग्य वापर, पाण्याचे पुनर्भरण व पाणी वाचविणारी पीक पद्धत, जमिनीची धुप नियंत्रण याबद्दल राज्यभर विविध स्तरावर जनजागृती, लोकशिक्षण मोहिम, कार्यशाळा व प्रशिक्षण या माध्यमातून राबविणे.

४. जल व भूमी संधारणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्राम पंचायती तसेच स्वयंसेवी संस्थांना या कार्यक्रमाचे नेतृत्व घेण्यास प्रोत्साहन देऊन त्यांच्या कार्यक्रमात शासनाचा सहभाग ही संकल्पना राबविणे.

**अभियान कालावधीत मृद संधारण व लघु पाटबंधारे प्रकल्पांमधील करावयाची प्रमुख कामे :**

१. गाळ काढणे.
२. कार्यक्रमाची प्रसिध्दी करणे.
३. मूलस्थानी जलसंधारणाची कामे करणे.
४. विहीर पुनर्भरण करणे.
५. कच्चे बंधारे बांधणे.
६. वनराई बंधारे बांधणे.
७. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना गेट्स बसविणे.

**निधीचा स्त्रोत :**

सदर अभियाना करीता सन २०११-१२ मध्ये प्रथमत:च राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून रू.३०.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून दिला आहे. सन २०१४-१५ मध्ये सदर योजनेकरीता RKVY मधून रु.२५ कोटी निधीला मंजुरी दिली आहे.

सन २०१३-१४ मध्ये एकूण ६७९६ उपचार / प्रकल्पांमधून लोकसहभागाद्वारे एकूण १८५.४९ कोटी घनफूट गाळ काढण्यात आला आहे.